# १४

# छत्रपती संभाजी महाराज

**(इ. स. १६८० ते १६८९)**

के. बालाजी

असामान्य कर्तृत्व गाजविणाऱ्या पित्याच्या पुत्राला इतिहासाने क्वचितच न्याय दिला आहे. पित्याच्या पार्श्वभूमीवरच पुत्राचे मूल्यमापन इतिहासाने आजवर केल्याने अकबरपुत्र जहांगीर किंवा शिवाजीपुत्र संभाजी हे दुर्दैवी ठरले आहेत. त्यांचे स्वतंत्रपणे मूल्यमापन केल्यास तेही असामान्य पित्याचे असामान्य पुत्र होते असे दिसून येईल.

समकालीन साधनांतून संभाजीचे करण्यात आलेले वर्णन आणि आधुनिक इतिहासकारांनी संभाजीवर टाकलेला नवा प्रकाश या दोहोंचाही तौलनिक अभ्यास करून संभाजीचा विचार करायला हवा. कृष्णाजी अनंत सभासद, मल्हारराव चिटणीस या समकालीन लेखकांचे लिखाण आणि गो. स. सरदेसाई, जदुनाथ सरकार, त्र्यं. शं. शेजवलकर, वा. सी. बेंद्रे, डॉ. कमल गोखले, विजय देशमुख या आधुनिक लेखकांचे लिखाण शिवाय अनेक कागदपत्रे, परकीयांचे लिखाण इ. वरून छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास समजण्यास मदत होते.

**राज्याभिषेकापर्यंतच्या घटनांचा संक्षिप्त आढावा (इ. स. १६५७ ते १६८०)**

**जन्म व बालपण :** शिवाजी महाराजांच्या ज्येष्ठ पत्नी सौ. सईबाई यांच्या पोटी पुरंदरगडावर ज्येष्ठ पुत्र शंभूराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी झाला. शंभूराजांचा जन्म झाला आणि सईबाईंना बाळंत रोगाने ग्रासले. ५ सप्टेंबर १६५९ रोजी सईबाईंचा मृत्यू झाला आणि वयाच्या केवळ सव्वा दोनव्या वर्षी बाळशंभूराजे मातृछत्राला पारखे झाले. परंतु जिजामातेने त्यांना मातृसुखाची कधीच उणीव भासू दिली नाही. ज्येष्ठ पुत्र शिवाय आईविना पोरका म्हणून शंभूराजांचे बालपण अतिशय लाडात गेले. इ. स. १६७० पर्यंत म्हणजे राजारामाचा जन्म होईपर्यंत महाराजांचा सारा राणीवसा शंभूराजांच्याच कौतुकात दंग होता. शिवाजी महाराजांना जरी शंभूराजांचे कोडकौतुक करण्यास वेळ नसला, तरी शंभूराजांच्या शिक्षणाची आबाळ होऊ नये याकडे महाराजांनी खास लक्ष दिले. शंभूराजांनी पुढील काळात 'बुधभूषण' सारखा ग्रंथ लिहिला त्यावरून त्यांना योग्य शिक्षण मिळाले असावे असे दिसते.

शंभूराजे लहान असताना पासूनच महाराजांनी त्यांच्या राजकीय प्रशिक्षणाकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. पुरंदर तहाच्या वेळी (इ. स. १६६५) ८ वर्षांच्या शंभूराजांना महाराजांनी सोबत घेतले होते. याच तहाद्वारे वयाच्या आठव्या वर्षी ते मोगल बादशहाचे पंचहजारी मनसबदार झाले. महाराजांनी

शंभूराजांना आग्र्यालाही सोबत नेले होते. त्यावेळी शंभूराजे केवळ ९ वर्षांचे होते. महाराज जरी औरंगजेबाच्या नजरकैदेत असले, तरी शंभूराजे हे बादशाही मनसबदार असल्याने त्यांच्या हिंडण्याफिरण्यावर कोणतेही बंधन नव्हते. ते रोज दोनदा मोगल दरबारात जात. आग्रा वास्तव्यात त्यांच्या काही दरबारी अधिकाऱ्यांच्या गाठीभेटी झाल्या असण्याची शक्यता आहे. बालवयात मोगली थाटमाट आणि ऐश्वर्य त्यांच्या नजरेला पडल्याने व मोगली प्रवृत्तीचे जवळून दर्शन घडल्याने त्या प्रवृत्तीचा त्यांच्या मनावर नकळत संस्कार झाला असल्यास नवल नाही.

आग्र्याहून सुखरूप परत आल्यावर मोगल-मराठे यांच्यात करार होऊन संभाजीराजांना पुन: मोगली मनसब बहाल करण्यात आली. त्यामुळे ते काही काळ औरंगाबाद येथे मोगली मनसबदार म्हणून शहजादा मुअज्जमच्या सहवासात राहिले. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांच्यावर महाराजांनी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविण्यास सुरुवात केली. इ. स. १६७१ मध्ये संभाजीराजांना रायगडाच्या राज्यकारभारात स्थान देण्यात आले. त्यांच्यावर स्वतंत्र लष्करी जबाबदारीही सोपविण्यात आली. त्यांच्या हाताखालचे सैनिक व अधिकारी या लहानग्या सेनापतीवर निहायत खूष असून त्यांच्यासाठी जान कुर्बान करायला सदैव तयार असत. या बालसेनापतीच्या तडफ, धाडस व शौर्यचे त्यांच्या सैन्याला अतिशय कौतुक वाटे.

**युवराज्याभिषेक (इ. स. १६७५)** : महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर इ. स. १६७५ मध्ये शंभूराजांना युवराज्याभिषेक करण्यात आला. त्यावेळी ते १८ वर्षांचे म्हणजे तारुण्याच्या ऐन उंबरठ्यावर होते. याच सुमारास त्यांच्या हातून एक बदकर्म घडल्याने महाराजांना प्रचंड धक्का बसला. महाराजांचे मंत्रिमंडळही युवराजाच्या या वागणुकीने हादरले. शंभूराजे मुळातच उच्छृंखल स्वभावाचे होते. त्यात तारुण्याचा आवेश. त्यांना लगाम घालणे मंत्रिमंडळाला जमेना. त्यातून मंत्रिमंडळाने राजारामाचा पक्ष उचलून धरला. कौटुंबिक कटकटींना सुरुवात झाली. आपल्या माघारी या कटकटींनी विकृत वळण घेऊ नये म्हणून महाराजांनी कर्नाटक स्वारीवर जाण्यापूर्वी युवराज संभाजीला शृंगारपूर सुभ्याचा कारभार सोपवून स्वराज्यापासून दूर ठेवले.

शृंगारपूर येथे शंभूराजांचा शाक्त पंथियांशी घनिष्ठ संबंध येऊन ते शाक्तपंथियांच्या काहींसे आहारी गेले. महाराजांना याची गंधवार्ता लागताच महाराजांनी शंभूराजांची रवानगी सज्जनगडास समर्थांच्या सहवासात केली. तरुण वय, उतावळा स्वभाव, मंत्रिमंडळाचे पक्षपाती धोरण, महाराजांचा रोष इ. कारणांमुळे शंभूराजे दिलेरखानाला जाऊन मिळाले, परंतु स्वराज्याच्या सुदैवाने लवकरच स्वराज्यात परतले. शंभूराजांच्या अशा वागण्याने ते महाराजांच्या मनातून कायमचे उतरले.

**युवराज छत्रपती झाले (१६ जाने १६८१)**

२२ मार्च १६८० ला महाराज आजारी पडले. तेव्हा शंभूराजे पन्हाळगडास होते. महाराजांचा हा आजार अत्यंत गंभीर स्वरूपाचा होता. शारीरिकदृष्ट्या या आजाराने ते इतके खंगले की राजकारणासंबंधी कोणतेही निर्णय घेणे त्यांना शक्य नव्हते. त्यांच्या मनात आजारपणाच्या

दिवसांच्या काळात शंभूराजांविषयी नेमक्या कोणत्या भावना होत्या हे कळायला मार्ग नाही. ते कर्तव्यदक्ष राजे असले तरी प्रेमळ पिताही होते. आपला काळ आला आहे. याची जाणीव त्यांना असणारच. अशा परिस्थितीत आपल्या जेष्ठ पुत्राला शेवटचे डोळे भरूनन पाहण्याची त्यांना इच्छा होणे स्वाभाविकच आहे. कदाचित त्यांनी शंभूराजांना बोलावणे पाठविण्याचा आदेशही मंत्रिमंडळाला दिला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु शंभूराजांच्या विरोधात सोयराबाई आणि मंत्रिमंडळाचा गट इतका शक्तिशाली होता की, त्यांनी महाराजांच्या आजारपणाची बातमीही शंभूराजांना कळणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली. शेवटचे ५-६ दिवस तर महाराज बेशुद्ध अवस्थेतच होते. त्यामुळे दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहण्याचेही त्यांना भान नव्हते. शेवटी ४ एप्रिल १६८० रोजी महाराजांचा मृत्यू झाला आणि संभाजी विरोधी गट गतिशील झाला. गडावर यावेळी पेशवा मोरोपंत आणि अण्णाजी दत्तो, प्रल्हाद निराजी, बाळाजी आवजी ही ज्येष्ठ मंडळी होती. सेनापती हंबीरराव मोहिते कऱ्हाडजळ होते. त्यांनाही याची काहीच कल्पना नव्हती. २१ एप्रिल १६८० रोजी अण्णाजी दत्तो यांनी राजारामाला छत्रपती म्हणून घोषित केले. अण्णाजी दत्तो व मोरोपंतांपुढे आता एकच कार्य होते आणि ते म्हणजे संभाजीला पन्हाळगडावरच कैद करणे. तेवढे साध्य झाले म्हणजे त्यांची योजना पूर्ण होणार होती. या दोन मुत्सद्यांची आतापर्यंतची प्रत्येक योजना यशस्वी झाली होती. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला. परंतु त्यांच्या हातून एक क्षुल्लकशी चूक घडली. आणि त्यांची सारी योजना मातीमोल झाली.

अण्णाजी दत्तो व मोरोपंत ससैन्य रायगडाहून पन्हाळगडाकडे संभाजीला कैद करण्यास निघाले. त्यांच्या या कार्यात सेनापती हंबीरराव मोहितेचे त्यांना पूर्ण सहकार्य लाभेल हा त्यांचा फाजील आत्मविश्वास. हा आत्मविश्वास अनाठायी नव्हता. कारण हंबीरराव राजारामाचे सख्खे मामा होते. अण्णाजी व मोरोपंत कऱ्हाडला हंबीररावांना भेटले व त्यांनी हंबीररावांना सारी योजना समजावून सांगितली. पण हंबीरराव लष्करगडी. त्याला राजकारणातले डावपेच कळत नव्हते. तो रणमर्द एकच सत्य जाणत होता की स्वतःचा सख्खा भाचा राजारामापेक्षा संभाजी छत्रपती होण्यास अधिक योग्य आहे. त्याने ताबडतोब अण्णाजी व मोरोपंताला कैद करून या बनावाची बातमी पन्हाळगडी संभाजीला कळवली. संभाजी रायगडाकडे २० हजार सैन्यासह अत्यंत तडफेने चालून गेला. विशेष प्रतिकार न होता रायगड संभाजीच्या ताब्यात आला. २० जुलै १६८० रोजी संभाजी मंचकावर आरूढ झाला. १६ जाने. १६८१ ला संभाजीचा राज्याभिषेक होऊन तो छत्रपती झाला.

**संभाजीची कारस्थान्यांप्रती वागणूक :** १८ जून १६८० रोजी संभाजी रायगडावर पोहोचला. गड हातात येताच त्याने प्रथम राजाराम, मोरोपंत व अण्णाजी यांना कैदेत टाकले. सोयराबाईच्या हालचालींवरही नियंत्रण ठेवण्यात आले. संभाजी कारस्थान करणाऱ्यांशी अत्यंत क्रुरतेने वागला, सोयराबाईला भिंतीत चिणून ठार मारले असे वर्णन उत्तरकालीन बखरीतून येते परंतु त्याला ऐतिहासिक आधार नाही. कारस्थान करणाऱ्यांना कैदेत टाकणे यात वावगे काहीच नाही. परंतु अण्णाजी व मोरोपंतांचे कर्तृत्व जाणून असल्याने संभाजीने दोघांचीही लवकरच सुटका केली. मोरोपंत आक्टो.

१६८० मध्ये आजारपणाने मृत्यू पावले. तेव्हा संभाजीने मोरोपंतांचा मुलगा निळोपंत याला पेशवेपद दिले. अण्णाजी दत्तोंना मुजुमदार केले. याचा अर्थ कटवाल्यांना संभाजीने केवळ उदार अंतःकरणाने क्षमाच केली नाही, तर त्यांना प्रतिष्ठेच्या जागा देऊन त्यांच्या कर्तृत्वाला योग्य वावही दिला. अशा रीतीने सर्व विरोधकांना आपलेसे केल्यावर संभाजीने १६ जाने. १६८१ रोजी स्वतःला राज्याभिषेक करून घेतला.

संभाजीच्या उदार वागणुकीचा कटवाल्यांनी वेगळाच अर्थ लावला. अंतःस्थपणे त्यांच्या संभाजी विरोधात कारवाया सुरूच राहिल्या. त्यांनी संभाजाली ठार मारून राजारामास गादीवर बसविण्याचा घाट घातला. त्यासाठी औरंगजेबाचा दक्षिणेत आलेला बंडखोरपुत्र अकबराशी त्यांनी संधान बांधले. परंतु अकबराने संभाजीला या कटाची बित्तंबातमी दिली. आता कटवाल्यांची गय करण्यात अर्थ नव्हता. ऑगस्ट १६८१ मध्ये संभाजीने अण्णाजी दत्तो, सोमाजी दत्तो, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद व कटात भाग घेणाऱ्या २० लोकांना हत्तीच्या पायाखाली देऊन ठार मारले. कट फसल्याचे पाहून मानी सोयराबाईने विष प्राशन करून आत्महत्या केली.

## संभाजी-मोगल संघर्ष

शिवाजी महाराजांच्या मृत्यूमुळे मोगल-मराठे संघर्ष संपुष्टात न येता किंवा त्याची धार बोथट न होता अधिक तीक्ष्ण झाली. संभाजीराजांनी छत्रपतीपदाची सूत्रे हाती घेतली. तेव्हा बहादूरखान हा दक्षिणेचा मोंगली सुभेदार होता. शिवाजी महाराजांच्या मृत्यूमुळे व मराठ्यांच्या गृहयुद्धामुळे मराठेशाही दुबळी झाली असेल या कल्पनेने औरंगजेबाने बहादूरखानाला मराठ्यांचे किल्ले व प्रदेश जिंकून घेण्याचा आदेश दिला. त्यानुसार बहादूरखानाने जुलै १६८० मध्ये बागलाणात मोहीम काढून अहिवंतगडास वेढा दिला. परंतु मराठ्यांनी खानाला कडवा प्रतिकार केल्याने खानाला माघार घ्यावी लागली.

**बुऱ्हाणपूरची लूट (३० जाने. १६८१)** : स्वराज्यात थोडी स्थिरस्थावर होताच इ. स. १६८० चा पावसाळा संपताच संभाजीने मोगली प्रदेशावर आक्टोबर महिन्यात मोहीम काढली. मराठ्यांच्या फौजेचे दोन भाग करण्यात येऊन एक फौज बुऱ्हाणपूरकडे, तर दुसरी औरंगाबादकडे पाठविण्यात आली. सेनापती हंबीरराव मोहित्यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी बुऱ्हाणपूरवर स्वारी करून उत्तर व दक्षिण मार्गावरील हे अत्यंत मोक्याचे केंद्र तीन दिवस मनसोक्त लुटले (३० जाने. १६८१) बुऱ्हाणपूरवर मराठ्यांनी स्वारी केल्याची बातमी लागताच बहादूरखानाने बुऱ्हाणपूरकडे त्वरेने धाव घेतली. परंतु मराठ्यांनी बुऱ्हाणपूरला मिळालेली प्रचंड लूट साल्हेर किल्ल्यावर सुरक्षितपणे आणली.

मराठ्यांची दुसरी फौज औरंगाबादकडे निघाली होती. तेव्हा त्या फौजेला थोपविण्यासाठी बहादूरखान औरंगाबादकडे वळला. त्यामुळे मराठ्यांची औरंगाबाद स्वारी बारगळली.

**शहजादा अकबर संभाजीच्या आश्रयाला :** नियतीचा खेळ मोठा विचित्र असतो. ती केव्हा कुणावर प्रसन्न होईल आणि केव्हा कुणावर वक्रदृष्टी फिरवेल सांगता येत नाही. शिवाजीपुत्र संभाजी दिलेरखानाला येऊन मिळताच आनंदाच्या उकळ्या फुटणाऱ्या औरंगजेबावर त्याचा पुत्र अकबर संभाजीला येऊन मिळताच ऊर बडविण्याची पाळी आणणारी नियती अगम्य आहे.

जोधपूरचा राजा जसवंतसिंह हा औरंगजेबाचा सप्तहजारी मनसबदार होता. तो काबूलच्या मोहिमेवर असताना डिसेंबर १६७८ मध्ये मृत्यू पावला आणि त्याच्या गादीसाठी त्याच्या वारसात भांडण सुरू झाले. औरंगजेबाने हे राज्य ताब्यात घेण्याचा प्रयत्न करताच सारे रजपूत चिडले व त्यांनी दुर्गादास राठोडच्या नेतृत्वाखाली औरंगजेबाच्या विरोधात एक भक्कम फळी उभारली. तेव्हा रजपुतांचा बिमोड करण्यासाठी औरंगजेबाने अकबर, आझमशहा आणि शहाआलम या आपल्या तीन पुत्रांना प्रचंड फौज देऊन इ. स. १६८० मध्ये रजपुतांविरुद्ध पाठविले. मोगली साम्राज्य स्वतःच्या बाहुबलावर पिढ्यान पिढ्या तोलून धरणाऱ्या शूर व स्वामिभक्त रजपुतांच्या अंतर्गत प्रश्नात औरंगजेबाने दखल द्यावी हे अकबराला सुरुवातीपासूनच मान्य नव्हते. या धोरणाने शूर रजपूत मोगलबादशाहीचे शत्रू होतील तेव्हा त्यांच्याशी सामोपचाराने वागावे हा अकबराचा सल्ला औरंगजेबाला पटला नाही. एवढेच नाही तर चितोडकडील रजपुतांचा बंदोबस्त करण्यात अकबराला अपयश येताच त्याने अकबराची जाहीर निंदा केली आणि राजपूत मोहिमेची सूत्रे स्वतःकडे घेतली. औरंगजेबाच्या या कृत्याने अकबर चिडला. त्याने दुर्गादास राठोडशी संधान बांधले आणि १ जानेवारी १६८१ रोजी स्वतःला मोगल बादशहा घोषित करून औरंगजेबाला जबरदस्त आव्हान दिले. परंतु औरंगजेब महाधूर्त होता. त्याने रजपूत व अकबरात फूट पाडून अकबराचा पराभव केला. बंडखोर अकबराला औरंगजेबाच्या क्रोधापासून स्वतःचा जीव वाचविण्यासाठी दुर्गादास राठोडच्या सल्ल्यावरून शेवटी दक्षिणेत संभाजीच्या आश्रयाला यावे लागले. जून १६८१ मध्ये अकबर दुर्गादासासह स्वराज्यात आला. संभाजीने उत्तर कोकणातील सुधागडजवळ पाली येथे अकबराच्या मुक्कामाची सोय केली. नोव्हेंबर १६८१ मध्ये संभाजीने पाली येथे जाऊन अकबराची भेट घेतली. पुढील योजनेसंबंधी दोघांत प्रदीर्घ वाटाघाटी झाल्या. परंतु तितक्यात औरंगजेब प्रचंड फौज घेऊन दक्षिणेत येत असल्याची बातमी आल्याने संभाजी पुढील तयारीसाठी त्वरेने रायगडी परतला.

**संभाजी-अकबर भेटीतील योजना :** औरंगजेबाच्या सत्तेला सुरुंग लावणे हे संभाजी व अकबर या दोहोंच्याही जीवनाचे ध्येय असल्याने या बाबतीतच त्यांच्यात प्रदीर्घ बोलणी होऊन एक योजना आखण्यात आली. यानुसार अकबर व दुर्गादास राठोड यांनी रजपुतांच्या मदतीने उत्तरेत उठाव करावा व दक्षिणेत संभाजीने उठाव करावा असे ठरले. संभाजी व अकबर यांची ऑगस्ट १६८२ मध्ये पुन्हा भेट झाली. त्यानुसार अकबराने अहमदाबादमार्गे राजपुतान्यात जावे असे ठरले. परंतु ही बातमी औरंगजेबाला समजताच त्याने गुजराथ, खानदेश, व माळव्याकडे जाणारे सारे मार्ग रोखून धरले, तसेच अकबराला कैद करण्याचे सर्वत्र हुकूम पाठविले. या सुमारास संभाजीवरही चहूबाजूंनी संकटे कोसळण्यास सुरुवात झाली. मोगल, सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज यांनी एकाचवेळी संभाजीविरुद्ध लढा सुरू

केला. त्यामुळे अकबराच्या अपेक्षा पूर्ण करणे संभाजीला जमेना. मराठ्यांच्या संगतीने औरंगजेबाला नमविणे शक्य नाही याची अकबराला खात्री पटली. अकबर व संभाजी यांच्यात कुरबुरीला सुरुवात झाली. तरीही पोर्तुगिजांविरुद्ध युद्धात अकबराने संभाजीला मदत केली.

अकबराने जरी औरंगजेबाविरुद्ध बंड केले असले तरी अकबराचे बळ फारसे नव्हते. मुत्सद्दीपणातही तो डावा होता. त्याच्या पाठीशी उभे राहण्याने स्वराज्याचे भले होईल याची संभाजीलाही खात्री वाटेना. अकबर म्हणजे स्वराज्याच्या गळ्यातील लोढणे ठरू लागले. शेवटी तो अत्यंत निराश अवस्थेत राजापूर बंदरातून फेब्रु. १६८७ मध्ये इराणकडे निघून गेला. पुढे तिकडेच त्याचा मृत्यू झाला.

**औरंगजेबाचे दक्षिणेत आगमन (मार्च १६८२)**

औरंगजेबाच्या दक्षिण स्वारीबाबत इतिहासाच्या अभ्यासकांच्या मनात काही प्रश्न उपस्थित होतात.

(१) शिवाजी महाराज जिवंत असेपर्यंत औरंगजेबाची दक्षिणेत येण्याची हिम्मत झाली नाही.

(२) अकबर दक्षिणेत आल्यामुळेच त्याच्या पाठोपाठ औरंगजेबालाही दक्षिणेत यावे लागले.

(३) अकबराला आश्रय देऊन संभाजीने औरंगजेबाचे संकट ओढवून घेतले.

शिवाजीमहाराज जिवंत असेपर्यंत दक्षिणेत येण्याची हिंमतच झाली नाही हा मुद्दा अतिशय बालिश आणि सत्याशी प्रतारणा करणारा आहे. कारण औरंगजेबाला शिवाजीपेक्षा वायव्य सीमेवरील युसुफझाई टोळ्या व इराणच्या शहाच्या आक्रमणाची जास्त चिंता वाटत होती. इराणच्या शहाचे संभाव्य आक्रमण झाले नाही आणि युसुफझाई टोळ्यांचा बंदोबस्त करून औरंगजेब मोकळा होत नाही. तोपर्यंत महाराजांचा मृत्यू झाला होता.

अकबर दक्षिणेत आला म्हणूनच औरंगजेबालाही दक्षिणेत यावे लागले. हा मुद्दाही अतिशय दुबळा आहे. आदिलशाही व कुतुबशाही ही शिया राज्ये बुडविणे आणि मराठेशाही नेस्तनाबूत करून दक्षिणेतही मोगलांचा एकछत्री अंमल प्रस्थापित करणे हे औरंगजेबाचे ध्येय होते. उत्तरेच्या राजकारणातून उसंत मिळताच तो दक्षिणेकडे वळणार होता. अकबराचा दक्षिण प्रवेश आणि औरंगजेबाला उत्तरेच्या राजकारणातून उसंत मिळणे हा योगायोग होता. अकबर दक्षिणेत आला नसता तरी औरंगजेबाला दक्षिणेत यावेच लागणार होते. अकबरामुळे त्याचे दक्षिणेत येणे थोडे अगोदर झाले एवढे फारतर म्हणता येईल.

अकबराला आश्रय देऊन संभाजीने औरंगजेबाची स्वारी ओढवून घेतली हाही मुद्दा वरील बाबींचा विचार केल्यानंतर रद्द होतो. अकबर हा निमित्त होता. तो दक्षिणेत आला नसता तरी औरंगजेबाला दक्षिणेत येणे भाग होते. कारण त्याच्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्ततेसाठी ते आवश्यक होते

अकबर दक्षिणेत मराठ्यांच्या आश्रयाला गेल्याचे कळताच औरंगजेबाने राजुपत्र आझमला अकबराच्या मागावर पाठविले. अकबर व संभाजी एक झाले तर आपल्या पुढील समस्यात अधिक भर पडेल या जाणिवेने स्वतः औरंगजेब प्रचंड लष्कर व युद्धसामग्री घेऊन दक्षिणेकडे आझम पाठोपाठ निघाला. नोव्हें. १६८१ मध्ये तो बुऱ्हाणपुरास आला आणि येथूनच त्याच्या आयुष्यातील एका नव्या पर्वाला सुरुवात झाली हे पर्व त्याच्या मृत्यूबरोबरच (फेब्रु. १७०७) समाप्त झाले.

जाने १६८१ मध्ये मराठ्यांनी बुऱ्हाणपूर लुटले, अकबरही दक्षिणेत आला. त्यामुळे औरंगजेब त्वरेने दक्षिणेकडे निघाला व १३ नोव्हें. १६८१ रोजी तो बुऱ्हाणपूरला आला. तेथून त्याने बागलाण व कोकणात मोगली फौजा पाठवल्या आणि स्वतः २२ मार्च १६८२ रोजी औरंगाबादला मुक्कामाला आला. ३० जाने. १६८२ रोजी हसनअलीखानने कल्याण जिंकले. बागलाणात साल्हेर परिसरात शहाबुद्दीनखान मराठ्यांशी झुंजत होता.

**रामसेजचा वेढा (एप्रिल १६८२) :** नाशिकजवळ रामसेजचा प्रसिद्ध किल्ला आहे. तो जिंकण्यासाठी औरंगजेबाने शहाबुद्दीनची रवानगी केली. शहाबुद्दीनने किल्ल्याच्या उंचीचा लाकडी बुरूज उभारून रामसेज किल्ल्यावर तोफांचा भडीमार केला. परंतु किल्लेदार संभा जबरदस्त जिगरीचा. त्याने शहाबुद्दीनच्या सर्व प्रयासांना विफल ठरविले. वेढा दिलेल्या मोगली फौजेवर बाहेरून मराठे हल्ले करीतच होते. शेवटी निराश झालेल्या शहाबुद्दीनला परत बोलावून त्याच्या जागी बहादूरखानाची नेमणूक करण्यात आली. परंतु ऑक्टोबर १६८२ मध्ये बहादूरखानालाही निराश होऊन वेढा उठवावा लागला.

**शहाजादा मुअज्जमची कोकणात रवानगी :** औरंगजेब औरंगबादला पोहोचण्यापूर्वीच जाने. १६८२ मध्ये हसनअलीने कल्याण जिंकले होते. परंतु अलीखानाची पाठ वळताच मराठ्यांनी कल्याणवर पुनः ताबा मिळविला, तेव्हा औरंगजेबाने रणमस्तखान व रूहुल्लाखान या दोन सरादारांना मोठ्या तयारीनिशी नोव्हें. १६८२ मध्ये कल्याणवर पाठविले. दोघांनी पुन्हा एकदा कल्याण जिंकले. पण दोघांची पाठ वळताच रूपाजी भोसलेने कल्याणहून मोगलांना हुसकावून लावले. हा पाठशिवणीचा खेळ कायमचा थांबविण्यासाठी सप्टें. १६८३ मध्ये औरंगजेबाने शहाजादा मुअज्जमची कोकणात रवानगी केली.

मुअज्जम मोठ्या उमेदीने जय्यत तयारीनिशी कोकणात निघाला. परंतु मराठ्यांनी त्याच्या मार्गात इतके अडथळे निर्माण केले की त्याच्या सैन्याला अन्न व घोड्यांना दाणावैरण मिळणे कठीण झाले. त्याला मिळणारी सर्व रसद मराठ्यांनी लुटली. त्यांच्या छावणीत अन्नधान्याचे भाव आकाशाला भिडले. शेकडो सैनिक व जनावरे अन्न व चाऱ्याअभावी मृत्यू पावले. निराश झालेला मुअज्जम परत फिरला. मराठ्यांविरुद्ध मोगलांना औरंगजेब दक्षिणेत आल्यापासून कोणताही नाव घेण्यासारखा विजय मिळाला नव्हता. बागलाण व कोकणातील मोहिमा फसल्या होत्या. तेव्हा मराठ्यांविरुद्धच्या कार्यवाहीला अधिक गती देण्यासाठी स्वतः औरंगजेब औरंगबादहून अहमदनगरला वास्तव्याला

आला.

औरंगजेबाचा दुसरा मुलगा आझम हा कोल्हापूर भागात मोहिमेवर होता. जाने. फेब्रु. १६८३ मध्ये हंबीरराव मोहित्यांनी त्याचा सडकून पराभव केला. मराठ्यांविरुद्ध सर्वत्र मिळणाऱ्या अपयशाने औरंगजेब अस्वस्थ झाला. आपण समजतो तितके मराठे दुबळे नाहीत याची त्याला खात्री पटली. तेव्हा तूर्त मराठ्यांविरुद्ध स्वतःची शक्ती खर्च न करता गोवळकोंडा व विजापूर ही दोन शिया राज्ये बुडविण्याचे औरंगजेबाने ठरविले. एकाचवेळी सिद्दी, पोर्तुगीज आणि मोगलांविरुद्ध लढणाऱ्या संभाजीला थोडा आराम मिळाला.

**आदिलशाही व कुतुबशाहीचा अंत :** मराठ्यांविरुद्धची मोहीम सहजासहजी आटोपणारी नाही हे लक्षात आल्यावर औरंगजेबाने तूर्त मराठ्यांचा नाद सोडून आदिलशहा व कुतुबशहाकडे मोर्चा वळविला. एप्रिल १६८५ मध्ये बहादूरखान व रुहुल्लाखानाची विजापूर मोहिमेवर रवानगी करण्यात आली. दोघांनीही विजापूरला वेढा दिला. ही मोहीम गतिशील व्हावी म्हणून औरंगजेब अहमदनगरहून सोलापुरास मुक्कामास आला. १२ सप्टें. १६८६ रोजी स्वतः औरंगजेब विजापूरवर चालून गेल्याने विजापूरचा प्रतिकार संपुष्टात आला व विजापूरच्या आदिलशाहीचा अंत झाला. आदिलशाही वाचविण्याचा संभाजीने कसोशीने प्रयत्न केला. विजापुरास मोगली वेढा पडला असताना संभाजीने मोगली प्रदेशात मराठी फौजा पाठवून उच्छाद मांडला पण त्याचा काहीही उपयोग न होता शेवटी आदिलशाहीने मोगल बादशाहीपुढे गुडघे टेकले.

इ. स. १६८५ मध्ये कुतुबशहाने मोगल बादशहाचे मांडलिकत्व मान्य केले होते. परंतु औरंगजेबाला आदिलशाहीप्रमाणे कुतुबशाहीचेही अस्तित्व जगाच्या पाठीवरून मिटवायचे होते. त्यामुळे विजापूरचा पाडाव होताच औरंगजेब गोवळकोंड्याकडे वळला (आक्टो. १६८६) कुतुबशहाने निकराचा प्रतिकार केला. परंतु २१ सप्टें. १६८७ रोजी कुतुबशाहीनेही शेवटचा श्वास घेतला. आदिलशाहीप्रमाणेच कुतुबशाही वाचविण्याचाही संभाजीने कसून प्रयत्न केला. परंतु मोगल बादशाहीपुढे त्याचे बळ तोकडे पडले.

आदिलशाही आणि कुतुबशाहीचा अंत झाल्यावर औरंगजेबाने सर्व लक्ष मराठ्यांवर केंद्रित केले.

**मोगल-मराठा संघर्षास पुनः सुरुवात**

औरंगजेब आदिलशाही आणि कुतुबशाही नष्ट करण्यात गुंतल्याने संभाजीला जी थोडीफार उसंत मिळाली. त्याचा उपयोग त्यांने कर्नाटकात स्वतःचे स्थान मजबूत करण्यासाठी केला. छत्रपतीपदाची सूत्रे हाती घेताच संभाजीने स्वतःचे मेहुणे हरजी महाडिक (अंबिकाचे पती) यांची कर्नाटकाचा सुभेदार म्हणून नेमणूक केली होती. महाराजांच्या सर्व जावयात हरजीराजे महाडिक सर्वात कर्तृत्ववान होते. त्यांनी कर्नाटकातील मराठी प्रदेशाचे संरक्षण करून म्हैसूर व मदुरेचा काही प्र

जिंकला.

मोगलांनी विजापूर जिंकल्यानंतर मोगली फौजा विजापूरचा दक्षिणेकडील प्रदेश जिंकण्यासाठी दक्षिणेकडे सरकल्या. विजापूरचा कर्नाटकातील प्रदेश मोगलांच्या ताब्यात गेला, तर कर्नाटकातील मराठी प्रदेशालाही धोका निर्माण होणार होता. म्हणून संभाजीने हरजी महाडिकच्या मदतीला संताजी घोरपडे व केसोत्रिमल यांना पाठविले. (फेबु. १६८७) परंतु कर्नाटकातील मराठा सरदारात आपसात सख्य नसल्याने मोगलांना थोपविणे त्यांना शक्य झाले नाही.

**स्वराज्यावर मोगली धाड (इ. स. १६८८-८९)**

औरंगजेबाने आदिलशाही आणि कुतुबशाही बुडविल्यावर त्याला स्वर्ग केवळ दोन बोटेच उरला होता. आता त्याचे लक्ष मराठेशाही बुडविण्याकडे लागले होते. ते ईप्सित साध्य झाले की तो उत्तरेत जाण्यास मोकळा होता. त्यासाठी त्याने स्वराज्यावर धाड घालण्याचे ठरविले. अशी धाड की स्वराज्यात मराठेशाहीचे एकही लक्षण शिल्लक राहू नये. स्वराज्याची चारही बाजूंनी कोंडी करण्याची योजना त्याने आखली. मराठ्यांच्या वेगवेगळ्या प्रदेशात मातब्बर मोगली सरदार पाठविण्यात आले. मातबरखानास बागलाण-नाशिक भागात, राजपुत्र आझमला बेळगाव भागात, तर शेख निझामला कोल्हापूर भागात पाठविण्यात आले. नाशिक-बागलाण आणि कोल्हापूर भागातील काही प्रदेश व किल्ले मोगलांच्या हाती आले. परंतु रायगड जिंकणे मोगलांना जमले नाही. कोकण व सह्याद्री प्रदेशातही मोगलांना यश मिळाले नाही.

**संभाजीची कैद व मृत्यू**

औरंगजेबाने शेख निझाम उर्फ मुकर्रबखानाची नेमणूक कोल्हापूर भागात केली होती. संभाजी यावेळी पन्हाळ्याच्या आसपास होता. तर संभाजीचा प्रमुख कारभारी कवी कलश हा मलकापूर भागात होता.

संभाजीची पत्नी येसूबाई ही शिर्के घराण्यातील. ही शिर्के मंडळी मोगलांना मिळाली होती. नोव्हें. १६८८ मध्ये शिर्क्यांनी पन्हाळा-खेळणा (विशालगड) भागात बंड उभारले. प्रमुख कारभारी या नात्याने कलश याने हे बंड मोडून काढण्याचा प्रयत्न केला त्यावरून कलश व शिर्के यांच्यात भांडण होऊन कलश पळून खेळण्यास आला. तेथे त्याने संभाजीला शिर्क्यांच्या बंडाची माहिती देताच संभाजी शिर्क्यांच्या प्रदेशात गेला व त्याने त्यांचा बंदोबस्त केला. बखरीमधून संभाजीने, "शिर्क्यांचे शिरकाण केले" असे वर्णन येते. शिरकाण याचा अर्थ कत्तल असा नसून शिर्क्यांचा प्रदेश जो शिरकाण त्या प्रदेशाचा बंदोबस्त संभाजीने केला. यानंतर संभाजी पुनः खेळणागडास आला. तेथून त्याला रायगडावर जायचे होते. पण कोल्हापूर भागात मुकर्रबखानाचा जागता पहारा असल्याने त्या भागातून कऱ्हाड, सातारा मार्गे रायगडाला जाणे धोक्याचे होते. म्हणून संभाजीने संगमेश्वर, चिपळूण मार्गे रायगडास जाण्याचा निर्णय घेतला. जानेवारी १६८९ मध्ये संभाजी कलश समवेत खेळण्याहून निघाला. वाटेत संगमेश्वर येथे त्याने बरेच दिवस मुक्काम केला.

कोल्हापूर भागात संभाजी असल्याची औरंगजेबाला कल्पना होतीच. त्याने मुकर्रब
संभाजीच्या हालचालींवर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवण्यास व संधी मिळताच कैद करण्याची
केली. त्यानुसार मुकर्रबखान संभाजीवर बारीक लक्ष ठेवून होताच. संभाजी संगमेश्वरला मुक्
असल्याचे त्याला कळले. संभाजीकडून झालेल्या अपमानामुळे शिर्के मंडळीही संभाजीवर
होतीच. त्यांना या प्रदेशाची खडानखडा माहिती होती. मुकर्रबखानाला जवळची गुप्त वाट
दाखविली असण्याची शक्यता आहे.

मुकर्रबखान कोल्हापूरहून ३ हजार फौजेनिशी त्वरेने निघाला. जवळच्या आडवाटेने रात्रप्र
करून १ फेब्रु. १६८९ रोजी संगमेश्वराला येऊन तो थडकला. कोल्हापूरहून इतक्या तडफेने संगमे
शत्रू येणे केवळ अशक्य असल्याने संभाजी बेसावध होता. तरीही मुकर्रबखानाला त्याने प्रति
करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. संभाजीजवळ यावेळी लहानशी फौज होती. त्या फौजेची मो
फौजेशी थोडी झटापट झाली. संभाजी व कलशला मुकर्रबखानाने कैद केले. उरलेले सैन्य रायग
पळून गेले. मुकर्रबखानाला कल्पनातीत यश मिळाले. स्वराज्याचा छत्रपती त्याच्या हाती अ
गवसला. क्षणाचीही उसंत न घेता त्याने संभाजी व कलशची रवानगी बहादूरगड येथे औरंगजेब
केली. औरंगजेबाला परमानंद झाला आतापर्यंत प्रत्येक गोष्ट त्याच्या मनाप्रमाणे घडून आली.
संभाजी व कलशला कैदेत टाकले. दोघांचे अत्यंत हाल करण्यात आले. संभाजीचे डोळे काढ
आले, यमयातना देण्यात आल्या. पण त्या सिंहाच्या छाव्याने औरंगजेबापुढे झुकण्यास नकार दि
शेवटी ११ मार्च १६८९ रोजी औरंगजेबाने वढू कोरेगाव येथे संभाजीला ठार मारले. संभाजी
धीरोदात्त मरणाने सारी मराठेशाही थरारून उठली.

## संभाजी-सिद्दी संबंध

पश्चिम किनाऱ्यावरील सिद्दी हा स्वराज्याला सलणारा कायमचा सल होता. त्याचा बंदो
करण्याचा शिवाजी महाराजांनी आटोकाट प्रयत्न केला. पण पाण्यात जशी सुसर आजिंक्य अस
जंजिऱ्याचा सिद्दी आजिंक्य होता. महाराजांनी सिद्दीला नामोहरम करण्याचा नानाप्रकारे प्रयत्न
त्यांच्या कारकिर्दीच्या शेवटी शेवटी त्यांचा मुंबईकर इंग्रजांशी जो तह झाला. त्या तहात इंग्रजांनी
बंदरात सिद्दीला थारा देऊ नये असे एक कलम होते. परंतु सिद्दीचा बंदोबस्त करणे महाराजांना
नाही. महाराजांचाच वारसा संभाजीने पुढे चालविला. त्यानी ऑगस्ट १६८० मध्ये सि
ताब्यातील उंदेरी बेट जिंकण्याचा प्रयत्न केला पण त्यात त्याला अपयश आले.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर सिद्दीचा स्वराज्याला होणारा उपद्रव वाढू लागला. तेव्हा
धडा शिकविण्यासाठी सप्टें. १६८० च्या एका काळोख्या रात्री संभाजीने २०० सैनिकांना उंदेरी
पाठविले पण संभाजीचा हाही प्रयत्न फसला. सिद्दीच्या आक्रमक हालचाली वाढू ला
मराठ्यांची जहाजे पकडू लागला. त्यामुळे १८ जुलै १६८१ रोजी मराठी आरमाराने उंदेरी

पुन्हा एकदा हल्ला केला. परंतु याही हल्ल्यात मराठ्यांना अपयश आले.

जंजिरा हे सिद्दीचे शक्तिस्थान होते. हे ताब्यात आले तर सिद्दी नाक मुठीत धरून शरण येणार होता. तेव्हा संभाजीने जंजिऱ्यावरच हल्ला करण्याचे ठरविले. याच सुमारास सिद्दीच्या सैनिकांनी मराठ्यांच्या आपटा आणि नागोठाणा परिसरात लुटालूट व जाळपोळ केली. त्यामुळे संभाजीने चिडून जाऊन दंडाराजपुरीस वेढा घातला. (डिसें. १६८१) दंडाराजपुरीच्या समुद्रातच जंजिरा किल्ला आहे. या मोहिमेत संभाजीसमवेत शहाजादा अकबर आणि २० हजार फौज होती. दंडाराजपुरीच्या कोटावर मराठ्यांचा तोफखाना सतत १५ दिवस आग ओकत होता. त्यामुळे कोटाच्या भिंती जमीनदोस्त झाल्या. दंडाराजपुरीतील खाडीतूनच जंजिऱ्याकडे मार्ग जात होता. ही खाडी बुजविण्याचा व किल्ल्यापर्यंत पोहोचण्याचा मराठे आटोकाट प्रयत्न करीत होते. परंतु दर्याने उग्र रूप दाखवायला सुरुवात केली. समुद्र खवळल्याने खाडी बुजविणे अशक्य झाले. इतक्यात मोगल सरदार हसनअली उत्तर कोकणात चालून येत असल्याची बातमी लागल्याने संभाजीने दंडाराजपुरीच्या वेढ्याची जबाबदारी दादाजी रघुनाथाकडे सोपविली. मराठ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास नियतीने पुनः हिरावून नेला.

ऑगस्ट १६८२ मध्ये सिद्दीने पुनः उचल खाल्ली. त्याने मराठ्यांच्या नागोठाण्यावर हल्ला करून अनेकांना कैद करून नेले. तेव्हा दौलतखान व सिद्दी मिस्त्री (हा मराठ्यांच्या चाकरीत होता) यांना आरमार देऊन संभाजीने त्यांची रवानगी सिद्दीवर केली. कोलगावजवळ भीषण युद्ध होऊन सिद्दी मिस्त्री मारला गेला. (आक्टो. १६८२) सिद्दीपक्षाचा प्रमुख सिद्दीमसूदही मारला जाऊन जंजिऱ्याची सूत्रे सिद्दी कासीम आणि सिद्दी खैरियत यांच्या हाती आली. याही आरमारी युद्धात मराठ्यांचा पाडाव झाला.

सिद्यांचे आत्मबळ यावेळी इतके वाढले होते की त्यांनी मुंबईकर इंग्रजांनाही त्रास देण्यास सुरुवात केली. इ.स. १६८४ मध्ये सिद्दी कासीमची मोगली आरमाराचा प्रमुख म्हणून सूरत येथे नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे जंजिऱ्याची सर्व सूत्रे सिद्दीखैरियतच्या हाती आली. इ.स. १६८६ मध्ये सिद्दी खैरियतने औरंगजेबाच्या चिथावणीवरून मराठ्यांविरुद्ध पुनः उचल खाल्ली. त्याने मराठ्यांचे काही किल्ले व प्रदेश जिंकून घेतला. जैतपूरच्या खाडीत मराठ्यांनी सिद्दीला चांगलाच धडा शिकविला. परंतु औरंगजेबाने मराठ्यांविरुद्ध सर्व शक्ती पणाला लावल्याने संभाजीला सिद्दीविरुद्धची मोहीम पुन्हा एकदा आवरती घ्यावी लागली.

सिद्दी व संभाजी यांच्यात अनेक वेळा युद्धे झाली. सिद्दीचा पुरता बंदोबस्त करणे संभाजीला जरी जमले नसले, तरी सिद्दिविरुद्धच्या प्रत्येक मोहिमेत संभाजीचा निर्धार व्यक्त होत होता. परंतु प्रत्येक वेळी शेवटच्या क्षणी कोणती ना कोणती अडचण येऊन संभाजीला सिद्दीविरुद्धची मोहीम अर्धवट सोडून द्यावी लागली. शेवटी जंजिरा आजिंक्यच राहिला.

## संभाजी - इंग्रज संबंध

सिद्दी हा मोगल बादशाहीच्या पश्चिम समुद्र किनाऱ्यावरील आरमाराचा प्रमुख होता. म्हणजे एकाअर्थी मोगलांचा चाकरच होता. इंग्रजांच्या सुरत व मुंबई येथे वखारी होत्या. पैकी सुरतची वखार ही महत्त्वाची असून ती मोगल प्रदेशात मोडत असे. त्यामुळे सुरतच्या इंग्रजांना सुरतच्या मोगली सुभेदाराच्या आज्ञेचे नेहमी पालन करावे लागले. मुंबईच्या इंग्रजांनी मुंबई बंदरात सिद्दीला नेहमी आश्रय द्यावा ही सुरतच्या सुभेदाराची सुरतकर इंग्रजांतर्फे मुंबईकर इंग्रजांकडे मागणी असे. त्यामुळे मुंबईकर इंग्रज अडचणीत येत. सुरतच्या इंग्रज वखारीच्या स्वार्थासाठी मुंबई बंदरात सिद्दीला आश्रय देणे त्यांना आवश्यक वाटे. परंतु मुंबई बंदरात सिद्दीला आश्रय दिला तर मराठ्यांची नाराजी ओढवून घ्यावी लागे. मुंबईकर इंग्रजांनी यातून मधला मार्ग काढला. सिद्दीला मुंबई बंदरात थारा देऊन मोगलांची मर्जी त्यांनी संपादन केली आणि मराठी मुलुखावर हल्ले होणार नाही या अटीवर हा थारा देऊन मराठ्यांच्या रोषापासून स्वतःला दूर ठेवले. परंतु सिद्दी इंग्रजांना दिलेला शब्द कधीच पाळत नसे आणि प्रत्येक वेळी मराठी मुलुखास त्रास देत असे. संभाजीने सुरतकर इंग्रजांच्या ओंजळीने पाणी पिणाऱ्या मुंबईकर इंग्रजांना धडा शिकविण्याचे ठरविले.

इ.स.१६८३ मध्ये संभाजीने गोव्याच्या पोर्तुगिजांवर आक्रमण करून त्यांची उत्तर कोकणातील मुंबईच्या आजूबाजूची माहीम, सोपारा, एलिफंटा ही बेटे जिंकून घेतल्याने मराठी सत्तेचा पाश मुंबईकर इंग्रजांच्या मानेभोवती आवळला गेला. मुंबईकर इंग्रजांची दुहेरी चाल अयशस्वी ठरली. दूरस्थ मोगलांपेक्षा जवळच्या संभाजीची मैत्री राखणे स्वतःच्या अस्तित्वासाठी त्यांना जास्त आवश्यक वाटू लागले. त्यांनी सुरतकर इंग्रजांचे वर्चस्व झुगारून देऊन मराठ्यांशी मे १६८४ मध्ये तह केले. त्यानुसार मुंबईच्या बंदरात इंग्रजांनी सिद्दीला थारा देऊ नये असे ठरलें. एप्रिल १६८४ मध्ये सिद्दी कासीम मुंबईजवळ आला असता इंग्रजांनी त्याला मुंबई बंदरात प्रवेश नाकारला. इंग्रजांशी तह करून संभाजीने फार मोठा राजनैतिक विजय मिळविला. पुढे इ. स. १६८७ मध्ये सिद्दीपासून इंग्रजांनी मुंबईच्या खाड्यांचे रक्षण करावे असा करार इंग्रज व संभाजी यांच्यात झाला. इंग्रजांसारख्या आरमारी शक्तीशी सिद्दीविरुद्ध तह करून संभाजीने फार मोठा राजकीय डाव साधला, पण त्याला या मैत्रीचा फायदा घेता आला नाही. कारण एवढ्यातच मराठे-मोगल संघर्षाला पुनः तोंड लागले. संभाजी मोगलांशी युद्ध करण्यात गुंतलेला पाहून सिद्दीने इंग्रजांना त्रास देण्यास सुरुवात केली. मोगली आक्रमण झाले नसते तर मुंबईकर इंग्रजांच्या मदतीने संभाजीला सिद्दीचा काटा काढण्यात नक्कीच यश आले असते.

## संभाजी-पोर्तुगीज संबंध

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर सर्वप्रथम येणारे आणि भारतातून सर्वात शेवटी जाणारे युरोपि[illegible] म्हणजे पोर्तुगीज. शिवाजी महाराजांचा मृत्यू झाल्यानंतर संभाजीला अनेक अंतस्थ कटाकटींना [illegible] द्यावे लागले. त्यात बाह्य शत्रूची भर नको म्हणून त्यांनी मे १६८० मध्ये रामोजी नाईक ठाकूर ना[illegible]

(२) एकमेकांनी एकमेकांची पकडलेली जहाजे व युद्धकैदी परत करावेत.

(३) दमणची चौथाई मराठ्यांना मिळावी.

(४) परस्परांचा परस्परांच्या प्रदेशातून पूर्वीप्रमाणे व्यापार सुरू करावा.

या तहावर शिक्कामोर्तब व्हावे म्हणून मार्च १६८४ मध्ये पोर्तुगीज वकील रायगडावर संभाजीकडे आले. परंतु संभाजीने काही नव्या अटी पुढे केल्याने (डिसें. १६८४) हा तह अस्तित्वात येण्यापूर्वीच बारगळला व मराठे-पोर्तुगीज संबंधात पुन्हा वितुष्ट आले.

**पोर्तुगिजांच्या मराठ्यांविरुद्ध हालचाली**

तह फिसकटल्याने पोर्तुगिजांनी दक्षिण कोकणातील देसायांना मराठ्यांविरुद्ध चिथविण्यास सुरुवात केली. पोर्तुगिजांच्या चिथावणीमुळे या देसायांनी फेब्रु. १६८५ मध्ये मराठ्यांविरुद्ध बंड पुकारले. या सर्व बंडखोरांना पोर्तुगिजांनी आश्रय दिला. एवढेच नव्हे तर खेम सावंत या देसायांच्या प्रमुखाशी करार करून त्याने मराठ्यांच्या मुलखावर स्वारी करावी, त्यासाठी आवश्यक ती सर्व मदत पोर्तुगिजांनी करावी व मराठ्यांचा जिंकलेला मुलुख दोघांनी आपसात वाटून घ्यावा असे ठरले.

**पोर्तुगिजांचे मराठी मुलखावर आक्रमण**

देसायांशी हातमिळवणी करून व त्यांना मराठ्यांविरुद्ध बंड करण्यास चिथावणी देऊन पोर्तुगिजांनी मराठी प्रदेशाची फार मोठी हानी केली. इ. स. १६८३ मध्ये मराठ्यांनी पोर्तुगिजांचा जिंकलेला प्रदेश केवळ फोंडा सोडून पोर्तुगिजांनी इ.स.१६८६ मध्ये परत मिळविला. यावेळी मोगली फौजा चहूबाजूंनी स्वराज्यात शिरत होत्या. त्यांच्यापासून स्वराज्याचा बचाव कसा करावा याच काळजीत संभाजी होता. त्याला पोर्तुगिजांच्या हल्ल्याकडे व देसायांच्या बंडाकडे लक्ष देण्यास अजिबात वेळ नव्हता. देसायांनीही मोगली चाकरी स्वीकारून स्वतःला मराठ्यांपासून सुरक्षित ठेवले. संभाजीने पोर्तुगिजांवरील दोन तीन मोहिमांत जे स्पृहणीय यश मिळविले होते ते मोगली आक्रमणामुळे धुळीस मिळाले. पोर्तुगिजांनी स्वतःचा गमावलेला सर्व प्रदेश मराठ्यांकडून जिंकून घेतला. तरीही संभाजीचे पोर्तुगिजांना नामशेष करण्याचे प्रयत्न सर्वथा वाया गेले नाहीत. कारण मराठ्यांच्या तरवारीचे पाणी जोखल्यामुळे पुढील काळात मराठ्यांविरुद्धच्या पोर्तुगिजांच्या हालचालींना काही प्रमाणात आळा बसला.

## संभाजीचे मूल्यमापन

भारतात इतिहास एक शास्त्र म्हणून फार उशिरा प्रगत पावले. आजही इतिहासलेखनाकडे हव्या तितक्या गांभीर्याने पाहिले जात नाही. त्यामुळेच आपल्या इतिहासाच्या पुस्तकांवर कादंबऱ्या आणि नाटकांचा प्रभाव जाणवतो. शिवाय कोणत्याही ऐतिहासिक व्यक्तीच्या मूल्यमापनाची एक सोपी आणि सोईस्कर रीत लेखकांनी शोधून काढली आहे. ती व्यक्ती यशस्वी झाली तर तिला सर्व गुण चिकटवायचे

आणि अयशस्वी झाली की सर्व दुर्गुण चिकटवायचे. संभाजीच्या बाबतीत नेमके हेच झाले. अयशस्वी ठरताच त्याला जगातील सर्व दुर्गुण चिकटविण्यात आले. गंमत म्हणजे सर्व राज सत्तांच्या ऱ्हासाची कारणे समान असतात व सर्व अयशस्वी ऐतिहासिक व्यक्तींमध्ये मद्य विलासप्रियता, बाहेरख्यालीपणा हे समान दुर्गुण असतात. हे मूल्यमापन अतिशय उथळ स्वरूपा आहे. दुर्दैवाने अशाच प्रकारच्या मूल्यमापनाला आजपर्यंत मान्यता मिळत आली आहे.

आजपर्यंत छत्रपती संभाजीराजे मूल्यमापन करीत असताना बखरींनाच आधारभूत मान आले होते. परंतु बखरींचा इतिहासाचे साधन म्हणून फार सांभाळून विचार करावा लागतो कारण त्य अनेक चुका व अतिशयोक्त वर्णन असते.

संभाजीला सर्व दुर्गुणांचा अर्क म्हणून सिद्ध केल्यावर काही इतिहासकार या विधानाला पु जोडतात. ती पुस्ती अशी की, "संभाजीने आयुष्यभर सर्वप्रकारचे गुण उधळले परंतु शेवटी त्याने वीरमरण पत्करले त्यामुळे त्याच्याविषयी मराठ्यांच्या मनात असलेला रोष नाहीसा होऊन संभाजीच्या बलिदानाचा सूड घेण्यासाठी चवताळून उठले." याही विधानाचा मूल्यमापनाच्या संदर्भा विचार करणे आवश्यक आहे.

थोर इतिहास संशोधक श्री. वा. सी. बेंद्रे, सेतुमाधवराव पगडी, डॉ. कमल गोखले यां निरनिराळ्या कागदपत्रांचा व ऐतिहासिक साधनांचा अभ्यास करून संभाजी महाराजांच्या चरित्र नवा प्रकाश टाकला आहे. तेव्हा जुन्या व नव्या दोन्ही मतांचा विचार करून संभाजीचे मूल्यमापन ठिकाणी अभिप्रेत आहे.

### (१) शिवाजी महाराजांचा वारसा चालविला

इ. स. १६८० मध्ये छत्रपतीपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर संभाजीने प्रशासनात जी परिपक्व दाखविली ती निःसंशय कौतुकास्पद आहे. महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्यात गृहयुद्ध होऊन मोरो पेशवे व अण्णाजी दत्तोंनी राजारामाचा पक्ष उचलून धरला व संभाजीला कैद करण्याचा प्रयत्न के त्यांचा हा कट अयशस्वी ठरवून संभाजी छत्रपतीपदी आरूढ झाला. सभासद बखरीच्या कथनानु संभाजी क्रूर व उतावळ्या स्वभावाचा असता तर त्याने सर्व कटवाल्यांना ताबडतोब हालहाल क ठार मारले असते. परंतु संभाजीने याप्रसंगी अतिशय समंजसपणे विचार करून स्वराज्याच्या उभार मोलाची कामगिरी करणाऱ्या या ज्येष्ठींना उदार अंतःकरणाने क्षमा करून अष्टप्रधान मंडळात साम घेतले. परंतु या ज्येष्ठींनी कटकारस्थाने करण्याचे न सोडल्याने त्यांचा दुसरा कट उघडकीला ये त्यांना मृत्यूदंडाची शिक्षा दिली. याप्रसंगी संभाजीने सुरुवातीला अपराध्याला त्याची पहिली सुधारण्याची संधी देण्याच्या महाराजांच्या उदारवृत्तीचा परिचय दिला पण एकदा केलेली चूक घडताच महाराजांचा कठोर शिस्तीचा बडगा अपराध्यांना दाखवून महाराजांचा वारसा चालविण्याचा निर्धार व्यक्त केला.

५ आठ ञावाळे
देगलूर



(२) अंतर्गत व बहिर्गत शत्रूंना यशस्वीपणे तोंड दिले.

संभाजीला अंतर्गत व बहिर्गत शत्रूंना एकाच वेळी तोंड द्यावे लागले. अंतर्गत शत्रूंचा बंदोबस्त ही अत्यंत नाजूक बाब होती. ती संभाजीने योग्य रीतीने हाताळली. बहिर्गत शत्रूंचा बंदोबस्त करीत असताना विशेषतः मोगल, सिद्दी आणि पोर्तुगिजांविरुद्ध संभाजीने तडफ, धाडस आणि शौर्याचा उत्कृष्ट परिचय दिला. तत्कालीन जगातील सर्वश्रेष्ठ मोगल सत्तेशी संभाजीने जो सामना दिला त्याला तोड नाही. शिवाजी महाराजांनीही मोगलांना सळो की पळो करून सोडले होते. परंतु संभाजीच्या कारकिर्दीत स्वतः मोगल बादशहा औरंगजेब सर्व शक्तीनिशी दक्षिणेत उतरला होता. गोवळकोंडा व विजापूर ही दक्षिणेतील बलाढ्य राज्ये मोगली वावटळीपुढे पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळून पडली होती. पोर्तुगिजांनी व कोकणातील देसायांनी मोगलांशी हातमिळवणी केली होती. स्वराज्याची सर्व बाजूंनी कोंडी करून स्वराज्याचा घास गिळण्यास औरंगजेब टपून बसला होता. अशा परिस्थितीत तुटपुंज्या साधनांनी संभाजीने मोगलांना यशस्वी तोंड दिले.

संभाजीने स्वराज्यावरील मोगली आक्रमणाचा दाब कमी करण्यासाठी बुऱ्हाणपूर, औरंगाबाद इ. मोगली प्रदेशात मराठ्यांच्या फौजा पाठवून मोगलांना चोख उत्तर दिले.

संभाजीची पोर्तुगिजांविरुद्धची मोहीम त्यांच्या लष्करी डावपेचांचा आणि शौर्य व धाडसाचा उत्कृष्ट नमुना आहे. दैवाने खैर केली असती तर गोवामुक्तीचे श्रेय संभाजीलाच मिळाले असते. संभाजीच्या भीतीने पोर्तुगिजांनी धडा घेतला. त्यांनी पश्चिमी किनाऱ्यावरील स्वतःच्या आक्रमक हालचालींना पायबंद घातला.

सिद्दीचा बंदोबस्त करणे जसे शिवाजीमहाराजांना जमले नाही तसे संभाजीलाही जमले नाही. एखाद्या कार्यात यश येणे न येणे यासाठी अनेक घटक कार्य करीत असतात. काही घटक मानवी नियंत्रणाच्या कक्षेपलीकडे असतात. फक्त प्रयत्न करणे मानवाच्या हाती असते. संभाजीने सिद्दीला नामोहरम करण्याचा कसोशीने प्रयत्न केला . परंतु त्याला यश आले नाही.

संभाजीला केवळ ९ वर्षांची अल्प राजकीय कारकीर्द लाभली. या अल्पकाळात मोगल, सिद्दी, पोर्तुगीज आणि इंग्रज या बलाढ्य शत्रूंना त्याला एकाचवेळी तोंड द्यावे लागले. या प्रयत्नात संभाजी बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाला असेच म्हणावे लागेल.

(३) मुत्सद्देगिरीचा परिचय दिला

संभाजीची प्रत्येक बाबतीत महाराजांशी तुलना केली जाते. महाराज हे असामान्य दैवी गुणांचा पुतळा होते. महाराजांचे दैवी गुण संभाजीराजांजवळ कदाचित नसतील परंतु संभाजीजवळ मुत्सद्देगिरीचा अभाव होता असे म्हणणे संभाजीवर अन्याय करण्यासारखे आहे.

औरंगजेबपुत्र अकबराला आश्रय देऊन संभाजीने स्वतः केलेल्या चुकीचे परिमार्जन केले. मोगल बादशहाच्या बंडखोर पुत्राला आश्रय देण्याचे परिणाम काय होतील याची संभाजीरावांना पूर्ण कल्पना

होती, पण राजकारणात असे धोके कधी कधी पत्करावे लागतात. अकबराला दिल्लीच्या गादीवर बसविण्याची संभाजीची चाल यशस्वी झाली असती, तर संभाजीचे नाव इतिहासात निश्चितच सुवर्णाक्षरांनी नोंदविले गेले असते. अकबर व दुर्गादास राठोडने उत्तरेत जाऊन औरंगजेबाविरुद्ध एक फळी उघडावी व दक्षिणेतील फळीचे नेतृत्व संभाजीने करावे अशी संभाजीची धूर्त चाल होती. परंतु ज्याच्या भरवशावर संभाजी ही जबरदस्त चाल खेळू पाहात होता तो अकबर कच्चा निघाला.

सिद्दीचा बंदोबस्त करण्याचा अयशस्वी प्रयत्न केल्यानंतर संभाजीने सिद्दी व इंग्रज यांची स्वराज्याविरुद्ध हातमिळवणी होणार नाही याची काळजी घेतली. उलट त्याने सिद्दीविरुद्ध इंग्रजांना स्वपक्षाकडे वळवून महान मुत्सद्देगिरीचा परिचय दिला.

**(४) दक्षिणीशाह्या वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न**

आदिलशाही व कुतुबशाही या दक्षिणेतील यावनी सत्ता जशा मराठ्यांचा शत्रू होत्या तशा मोगलांच्याही होत्या. या सत्ता नामशेष होण्याने मराठ्यांचे दोन शत्रू जसे नाहीसे होणार होते तसेच मोगलांचे दोन शत्रूही नाहीसे होणार होते. पण या दोन शाह्या नष्ट झाल्यावर औरंगजेबाला सारी दक्षिण मोकळी मिळणार होती. त्या परिस्थितीत स्वतःची सारी शक्ती मराठ्यांवर केंद्रित करून मराठ्यांचा काटा काढणे औरंगजेबाला सहज शक्य होणार होते. थोडक्यात मराठ्यांचे दक्षिणेतील अस्तित्व या दोन शाह्यांवर अवलंबून होते. याच कारणामुळे शिवाजीमहाराजांनी या दोन शाह्यांना मोगलांविरुद्ध वारंवार मदत केली होती. इ.स.१६८५ मध्ये औरंगजेब विजापूर व इ.स.१६८७ मध्ये गोवळकोंडा बुडविण्यास निघाला तेव्हा संभाजीने या दोन्ही शाह्या वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु यावेळी परिस्थिती वेगळी होती. स्वतः औरंगजेब या शाह्या बुडविण्यास निघाला होता आणि दुसरे म्हणजे अंतर्गत यादवीने या दोन्ही सत्ता खिळखिळ्या झाल्या होत्या त्यामुळे या शाह्या वाचविण्यात संभाजीला यश आले नाही. पण त्याचा प्रयत्न स्तुत्य होता.

**(५) प्रशासकीय कारभारात शिस्त**

संभाजीने छत्रपतीपदाची सूत्रे हाती घेताच स्वराज्यातील प्रत्येक किल्ला हा भांडता ठेवण्यासाठी किल्ल्यावर अन्नधान्य, दारुगोळा इ.ची चोख व्यवस्था ठेवली. कामचुकार, कारस्थानी, भ्रष्टाचारी आणि स्वराज्यद्रोही अधिकाऱ्यांना कठोर शिक्षा करून मुलकी व लष्करी प्रशासनात शिस्त व जरब निर्माण केली. मावळ खोऱ्यातील देशमुख सर्जेराव जेधे यांनी मोगलांशी हातमिळवणी करताच संभाजीने त्यांना खलिता पाठवून त्यांची कडक शब्दात हजेरी घेतली. सासरच्या शिर्के मंडळींनी मोगलांचा पक्ष स्वीकारताच नात्यागोत्याची पर्वा न करता संभाजीने त्यांचे शिरकाण केले. प्रशासकीय कामकाजात कुणाचाही मुलाहिजा न ठेवण्याच्या महाराजांच्या धोरणाचे संभाजीने तंतोतंत पालन केलेले दिसते.

एका राज्यकर्त्याला आवश्यक असे सर्व गुण संभाजीजवळ होते. संभाजीपेक्षा कमी कर्तृत्ववान माणसे यशस्वी झाल्याची नोंद इतिहासात पानोपानी आढळते. संभाजीचा स्वतंत्रपणे विचार केला तर एक असामान्य पराक्रमी, धाडसी योद्धा, कुशल व कठोर प्रशासक म्हणून इतिहासाला नोंद घ्यावी

लागेल. परंतु शिवाजमहाराजांच्या पार्श्वभूमीवर संभाजीचा नेहमी विचार होत असल्याने तत्कालीन समाजात सर्वमान्य असलेल्या काही गोष्टी संभाजीच्या बाबतीत दुर्गुण ठरतात. वास्तविक संभाजीपेक्षा कितीतरी व्यसनी व बाहेरख्याली राज्यकर्ते होऊन गेलेत, पण संभाजीच्या बाबतीत या गोष्टींना अवाजवी महत्त्व दिले गेले हे संभाजीचे दुर्दैव होय.

**(६) संभाजीच्या व्यक्तिमत्त्वाची दुसरी बाजू**

(अ) **बाहेरख्यालीपणा :** चिटणीस बखरीनुसार संभाजीच्या व्रतबंध विधीनंतर (४ फेब्रु. १६७५) एक प्रसंग रायगडावर घडला. शितलागौरीच्या हळदीकुंकवाच्या निमित्ताने काही सुवासिनी स्त्रिया राजवाड्यात आल्या. त्यातील एका रूपवान स्त्रीला संभाजीने ओढून नेले व तिच्याशी बदकर्म केले. मुंबईकर इंग्रजही या घटनेला दुजोरा देतात. यावेळी संभाजी १८ वर्षाचा म्हणजे तारुण्याच्या ऐन उंबरठ्यावर होता. या घटनेनंतर संभाजी रोज रात्री त्या स्त्रीला भेटण्यासाठी गडाखाली जात असे. स्त्रीचा अनादर करणाऱ्याला कठोर शिक्षा देणाऱ्या महाराजांना जेव्हा ही गोष्ट कळली तेव्हा त्यांना किती मनस्ताप झाला असेल याची कल्पनाच करवत नाही. या घटनेपासून संभाजी महाराजांच्या मनातून उतरला.

राज्यकर्ता व सामान्य मनुष्य यांच्या बाबतचे नीती-अनीतीचे संकेत भिन्न असतात. वास्तविक असा भेद नको. सर्वांसाठी एकच निकष हवा पण सहसा तसे होत नाही. कारण सत्ताधिशांसाठी वेगळे नियम व संकेत असतात. प्रश्न हा आहे की, यात बुडूनही सत्ताधीश माश्याप्रमाणे कोरडा राहतो की केवळ यातच बुडल्यामुळे कर्तव्यच्युत होतो. बाहेरख्यालीपणामुळे संभाजी राज्यकर्तव्याला पारखा झाल्याचे एकही उदाहरण दिसत नाही. धुतल्या तांदळासारखे चारित्र्य असणारे अनेक राज्यकर्ते इतिहासात नाकर्ते म्हणून सिद्ध झाले आहेत. संभाजीचा बाहेरख्यालीपणा त्याच्या प्रशासकीय कर्तव्याच्या आड येत असेल, तर संभाजीला दोष देता येईल पण तसे दिसत नाही.

(ब) **व्यसनाधीनता :** कर्नाटकाच्या स्वारीवर जाण्यापूर्वी महाराजांनी संभाजीची रवानगी शृंगारपुरास केली. या ठिकाणच्या शाक्त संप्रदयाच्या मठात संभाजीच्या जाण्यायेण्याने त्याच्यावर या संप्रदायाचा प्रभाव पडला. या संप्रदायाच्या उपासनेत शिव व शक्ती या दोन देवतांची उपासना असून ब्रह्मप्राप्ती हेच अंतिम उद्दिष्ट आहे, परंतु ब्रह्मप्राप्तीचा उपासनाविधी मात्र हिंदू धर्मातील सर्वमान्य विधीपेक्षा भिन्न आहे. या विधीत मद्य, मांस, मुद्रा, मत्स्य आणि मैथून या पंचमकाराला महत्त्व दिले जाते. संभाजी या पंचमकाराच्या अधिन झाला असा एक आरोप त्याच्यावर बखरकार करतात. शाक्तांच्या सहवासात संभाजीने या गोष्टींचा स्वाद अवश्य घेतला असेल, परंतु तो त्याच्या आहारी गेला हा आरोप खोटा आहे कारण शृंगारपुराला संभाजी व्यायाम, धनुर्विद्या, कामंदकी व इतिहासाच्या अभ्यासात वेळ घालवीत असे असा उल्लेख मिळतो. याच मुक्कामात त्यांनी 'बुधभुषण' हा प्रसिद्ध संस्कृत ग्रंथ लिहिला. शिवाय याच मुक्कामात 'नवशिखा' व 'नायिका भेद' ही दोन हिंदी शृंगारिक काव्येही लिहिली असण्याची शक्यता आहे. पंचमकारांच्या आहारी जाणाऱ्या व्यक्तीला हे सर्व साध्य

होणे शक्य नाही. महाराणी येसूबाई आणि दुर्गाबाई (संभाजीची दुसरी पत्नी असावी) या संभाजीसमवेत शृंगारपुरास होत्या. येसूबाईचा संभाजीच्या जीवनावरील प्रभाव लक्षात घेता तिच्या उपस्थितीत संभाजी व्यसनाधीन होणे संभवत नाही.

संभाजीने आयुष्यभर जरी निरनिराळे गुण उधळे असले, तरी त्याला जे वीर मरण आले त्यामुळे मराठे चवताळून उठले व संभाजीचे सर्व दुर्गुण विसरून त्याच्या बलिदानाचा सूड घेण्यासाठी कटिबद्ध झाले, असा विचार मांडणारे इतिहासकार संभाजी हा दुर्गुणी होता या गृहीत तत्त्वावरच आपल्या सर्व कल्पनांचा डोलारा उभा करतात. आतापर्यंतच्या विवेचनावरून हे गृहीत तत्त्व कसे चुकीचे आहे हे लक्षात आले असेल.

सारांश रुपाने असे म्हणता येईल की, राजारामाचा पक्ष धारण करणाऱ्यांनी व संभाजीकडून कळत न कळत दुखावल्या गेलेल्यांनी संभाजीच्या वरील दुर्गुणांना अवाजवी प्रसिद्धी दिलेली दिसते. संभाजी हा निष्कलंक चारित्र्याचा होता असे कुणीही म्हणणार नाही. परंतु बाहेरख्यालीपणा व व्यसन त्याच्या कर्तव्याच्या आड आले नाही हेही तितकेच खरे. डॉ. कमल गोखले लिहितात, "संभाजीराजे शूर होते, धैर्यवान, धाडसी, साहसी, योजक आणि निपुण होते. परंतु या सर्व गुणांबरोबर नियती त्यांच्या राजमुकुटात यशाचा तुरा लावण्यास विसरली होती."

## अभ्यासासाठी विद्यापीठीय प्रश्न

(१) संभाजी-मोगल संबंधाची चिकित्सात्मक चर्चा करा.

(२) संभाजीच्या व्यक्तिमत्त्वाचे यथायोग्य मूल्यमापन करा.

(३) टीपा : (१) संभाजी-पोर्तुगीज संबंध (२) संभाजी-सिद्दी संबंध

***